# बोर्ड प्रश्नपत्रिका : जुलै २०१६

## भूगोल आणि अर्थशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
iii. प्र.३ (अ), (ब), (क) संपूर्णपणे नकाशा, आलेख पुरवणीवरच सोडवावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
iv. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
v. १ ते ४ प्रश्न भूगोलाचे व ५ ते ७ प्रश्न अर्थशास्त्रावरील आहेत.
vi. आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व नकाशाचा वापर करा.

**प्र.१. (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** **[३]**

१. _______ या संकरित मेंढीची लोकर उच्च प्रतीची मानली जाते.
(चोकला, पुंगल, मारवाडी, मालपुरी)

२. वाराणसी _______ साठी प्रसिद्ध आहे.
(सुती साड्या, लोकरीच्या कपड्यां, रेशमी साड्या, चामड्याच्या वस्तूंची निर्मिती)

३. नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील त्रिकोणाकृती प्रदेश _______ चे पठार म्हणून ओळखला जातो.
(माळवा, बुंदेलखंड, छोटा नागपूर, दखन)

**(ब) 'अ ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा :** **[३]**

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | इंदिरा पॉईंट | अ. | अन्न प्रक्रिया उद्योग |
| २. | अमृतसर | ब. | खनिज संपत्तीने समृद्ध |
| ३. | छोटा नागपूर पठार | क. | भारताचे दक्षिण टोक |
| | | ड. | लाख काम |

**प्र.२. (अ) भौगोलिक कारणे लिहा (कोणतीही दोन) :** **[४]**

१. हिमालय हा भारतातील हवामान स्थिती निश्चित करतो.
२. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशाला भारताचे धान्य कोठार म्हणतात.
३. बंगालच्या उपसागरातील बेटांच्या तुलनेत अरबी समुद्रातील बेटांना कमी पाऊस मिळतो.
४. मळ्यांची शेती मुख्यत: पश्चिम घाटाच्या दक्षिण भागात एकवटली आहे.

**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन) :** **[४]**

१. मरुस्थळाची प्राकृतिक रचना
२. पंजाब-हरियाणा मैदानातील जलसिंचन
३. भारताच्या स्वाभाविक विभागातील भूविज्ञान

**प्र.३. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे विभाजित आयत तयार करा :** **[२]**

| शेती उत्पादने (खरीप २०१०-११) | |
|---|---|
| **पिके** | **% (शेकडेवारी)** |
| तांदूळ | ४३ |
| अन्नधान्य | २० |

| | |
|---|---|
| कडधान्य | ०८ |
| तेलबिया | १४ |
| कापूस | १५ |
| एकूण | १०० |

**(ब) खाली दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[२]**




**प्रश्न :**

१. पश्चिम वाहिनी नदीचे नाव लिहा.

२. गोदावरी नदी कोणत्या दिशेला वाहते?

३. दिलेल्या नकाशातील पठारांची नावे लिहा.

४. कर्नाटक पठारावरील टेकड्यांची नावे लिहा.

**(क) तुम्हास पुरविलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा व त्यांना नावे द्या. (सूची आवश्यक आहे) (कोणतेही दोन) :** **[२]**

१. मुंबई बंदर | २. पाल्क सामुद्रधुनी

३. सुंदरबन | ४. अरवली पर्वत

**प्र.४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

१. हिमालयीन प्रदेशातील पर्यटन व्यवसायाची गुणवैशिष्ट्ये सांगा.

२. भारताच्या पठारी मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील शेतीची वैशिष्ट्ये कोणती?

३. भारतीय पूर्व घाटातील वाहतुकीची माहिती लिहा.

**प्र.५. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा:** **[२]**

१. श्रमापेक्षा यंत्रसामुग्रीचा जास्त वापर _______ तंत्रामध्ये केला जातो.

(भांडवलप्रधान, श्रमप्रधान, पारंपरिक)

२. 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर वस्तू व सेवांचे उत्पादन व त्यांचा पुरवठा _______ क्षेत्राद्वारे केला जातो.

(संयुक्त, खासगी, सार्वजनिक)

**प्र.६. प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[६]**

१. नैसर्गिक साधनसामग्री म्हणजे काय? उदाहरण द्या.

२. भारवाढीचे आर्थिकेतर परिणाम लिहा.

३. सार्वजनिक कर्ज म्हणजे काय?

४. ग्राहक संरक्षण कायद्याची मुख्य उद्दिष्टे कोणती?

५. सार्वजनिक वितरण प्रणालीतील कोणतेही दोन फायदे लिहा.

**प्र.७. पुढील प्रश्नांची पाच किंवा सहा वाक्यांत उत्तरे लिहा (कोणताही एक):** **[४]**

१. भाववाढ नियंत्रित करण्याचे मौद्रिक उपाय स्पष्ट करा.

२. सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा स्पष्ट करा.